# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**Estd: 1962**

**NAAC "A++" Grade**

## :: परिपत्रक ::

**विषय** : एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क थेअरी परीक्षा ऑक्टोबर/नोंव्हेबर - २०२१
**संदर्भ** : शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/११९ दि. ०७.०४.२०२२

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व विद्याशाखांच्या एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा वर्षातून दोन वेळा आयोजित करण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने परीक्षक नियुक्ती विभागाकडील उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये परीक्षा अर्ज भरण्याची मुदत, परीक्षा संचलन, कार्यवलन याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अनुषंगिक कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. **तसेच ज्या विद्यार्थ्यांचे कोर्सवर्क पूर्ण झाले आहे केवळ अशाच विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरणेचे आहेत. कोर्सवर्क न झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज पुढील प्रक्रियेसाठी स्वीकारण्यात येणार नाहीत**. सबब, परीक्षा अर्ज भरण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२१ परीक्षेकरिता नव्याने रजिस्ट्रेशनसह परीक्षा अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता :**

**(अ)** ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२१ परीक्षेकरिता प्रविष्ठ होणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांनी आपला युजरआयडी व पासवर्ड तयार करून घ्यावा व त्यानंतर Login करून रजिस्ट्रेशन फॉर्म भरावा. सदरचा रजिस्ट्रेशन फॉर्म संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्र यांचेमार्फत Approve करणेत यावा. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचा पीआरएन तयार होईल. पीआरएन (कायम नोंदणी क्रमांक) प्राप्त झाल्यानंतर परीक्षा अर्ज भरावा. या सर्व कार्यवाहीकरिता खालील संकतेपत्त्याचा वापर करावा.

**FOR REGISTRATION :**

http://www.unishivaji.ac.in/online_portal ➔ Student (Only for Regular Student) ➔ Link For M.Phil./Pre-Ph.D. Coursework Registration Form ➔ New Student Registration ➔ Student Registration ➔ Submit ➔ Go Back ➔ User Name ➔ Password ➔ Login ➔ Complete the Registration Form & Submit ➔Department Approval.

....2

**FOR FILLING UP EXAMINATION FORMS :**

http://www.unishivaji.ac.in/online_portal ➔ 2021 Imp. Links for Students ➔ M.Phil./Pre-Ph.D. Coursework Theory Examination Forms-OCT.2021 ➔ PRN No. ➔ Password ➔ Login ➔ Fill Exam Form ➔ Department Approval.

तसेच प्राप्त पर्यायानुसार शुल्क रू. १११०/- ऑनलाईन भरावे आणि अर्ज प्रणालीमध्ये Submit करावा. अर्जासोबतचे **परिशिष्ठ** विद्यार्थ्यांनी प्रिंट करून ते पूर्ण भरावे. आवश्यक तेथे सक्षम कागदपत्रे जोडावीत व संबंधितांच्या सह्या घेऊन सदरचे परिशिष्ठ संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्रामध्ये सादर करावे.

अधिविभाग/संशोधन केंद्राकडून आपल्या स्तरावर परिशिष्ठ व अर्ज तपासून त्यातील त्रूटी दूर करून घ्याव्यात. तद्नंतर अधिविभाग/संशोधन केंद्रामध्ये त्यांच्या Login मधून सदरचा अर्ज Approve करण्यात येईल. सदर अर्जांची प्रत व विद्यार्थ्यांनी सादर केलेले परिशिष्ठ संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्र यांनी परीक्षा विभागाकडे मुखपत्रासह सादर करावी.

**(ब) जे नवीन (Fresh) विद्यार्थी मे २०२१ मध्ये प्रथमत: परीक्षेकरिता प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी खालील संकेतपत्त्यावरून परीक्षा अर्ज भरावा.**

http://www.unishivaji.ac.in/online_portal ➔ 2021 Imp. Links for Students ➔ M.Phil./Pre-Ph.D. Coursework Theory Examination Forms-OCT.2021 ➔ PRN No. ➔ Password ➔ Login ➔ Fill Exam Form ➔ Department Approval.

तसेच प्राप्त पर्यायानुसार शुल्क रू. १११०/- ऑनलाईन भरावे आणि अर्ज प्रणालीमध्ये Submit करावा. अर्जासोबतचे परिशिष्ठ विद्यार्थ्यांनी प्रिंट करून ते पूर्ण भरावे. आवश्यक तेथे सक्षम कागदपत्रे जोडावीत व संबंधितांच्या सह्या घेऊन सदरचे **परिशिष्ठ** संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्रामध्ये सादर करावे.

अधिविभाग/संशोधन केंद्राकडून आपल्या स्तरावर परिशिष्ठ व अर्ज तपासून त्यातील त्रूटी दूर करून घ्याव्यात. तद्नंतर अधिविभाग/संशोधन केंद्रामध्ये त्यांच्या Login मधून सदरचा अर्ज Approve करण्यात येईल. सदर अर्जांची प्रत व विद्यार्थ्यांनी सादर केलेले परिशिष्ठ संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्र यांनी परीक्षा विभागाकडे मुखपत्रासह सादर करावी.

**मार्च २०२१ पूर्वी ऑफलाईन/मॅन्युअल पध्दतीने परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांकरिता :**

**(क)** EPS - Old System मधील अनुत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थीनी आपले मॅन्युअल परीक्षा अर्ज मॅन्युअली भरून दोन फोटो, एक्स्टेंशन अॅप्रुव्हल (असल्यास), शुल्क रू. १११०/-, अभ्यासक्रम शुल्क भरल्याची पावती, इ. सक्षम कागदपत्रांसह संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्रामध्ये सादर करावेत. अधिविभाग/संशोधन केंद्राकडून सदरचे अर्ज योग्यरित्या तपासून परीक्षा विभागामध्ये एकत्रित यादीसह सादर करावेत. अपूर्ण अर्ज परीक्षा विभागाकडे सादर करू नयेत.

या संदर्भात काही तांत्रिक/प्रशासकीय अडचण उद्‌भवल्यास अथवा अधिकची माहिती आवश्यक असल्यास ०२३१-२६०९३३५/२६०९११८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

तसेच उपरोक्त संदर्भिय परीक्षक नियुक्ती विभागाकडील पत्रामध्ये परीक्षा अर्ज भरण्याकरिता नमूद केलेली अंतिम मुदत खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे. त्यानुसार परीक्षा अर्ज सादर करण्यात यावेत.

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाची मुदतवाढ | महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज Approve करण्याबाबतची मुदतवाढ | महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करावयाची तारीख |
|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | -- | -- |
| दि. १८.०४.२०२२ | दि. १९.०४.२०२२ | दि. २०.०४.२०२२ |

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/
दि. १२/०४/२०२२

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व अधिविभाग, संबंधित महाविद्यालये, संशोधन केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर